# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 13/10/2023 (शुक्रवार) दुपार


---

## पो.स्टे. कन्हान हद्दीत अवैध कोळशाची साठवणूक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण ची कारवाई

दिनांक १२/१०/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिणचे पथक उपविभाग कन्हान अंतर्गत अवैध धंदयावर आळा घालणेकामी पेट्रोलिंग करीत असतांना गोपनिय बातमीदारां कडुन माहिती मिळाली की, पोस्टे कन्हान हद्दीतील गहूहीवरा रोडवर नीलेश श्रीवास्तव नावाचा ईसम वेकोली कन्हान येथील कोळसा चोरून अवैधरित्या एन. एस इन्टरप्राईजेस नावाचे बोर्ड लावून आपले टालवर अवैधरित्या कोळसा साठा करून ठेवला आहे. अशा मिळालेल्या खबरेवरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नमुद घटनास्थळी रेड केली असता तिथे एका १४ चक्का ट्रक हा कोळशाने भरलेला टालवर अवैधरीत्या विनापरवाना चोरीचा कोळसा विकण्याचे तयारीत असताना मिळून आल्याने ट्रक क्रमांक MP-28 H-1472 चा चालक याला नाव विचारले असता आरोपी याने आपले नाव **सल्लाउद्दीन सैजाद हुसेन नागोरी, वय २६ वर्ष रा. ग्राम खोरीया सुमरा ता. मेहतपुर जि. उज्जैन म. प्र. कन्हान** असे सांगितले. त्याला ट्रक मध्ये असलेल्या कोळशाबाबत कागदपत्राची पाहणी केली असता कोणतेही कागदपत्र नसल्याचे सांगीतले. सदर कोळसा बाबत माहिती प्राप्त केली असता सदर कोळसा हा निलेश श्रीवास्तव नावाचा इसम राहणार खदान नंबर ०३ याने अवैधरित्या साठवून ठेवल्याचे समजले त्यांचे सोबत ट्रक चालकाचे मोबाईल वरून संपर्क केला असता त्याने त्याचे टाल वरून भरलेल्या कोळसा बाबत समाधान कारक उत्तर दिले नाही तसेच ट्रक मध्ये असलेल्या कोळशाबाबत कोणतेही कागदपत्र पेश केले नाही यावरून सदर कोळसा हा चोरीचा दिसून आल्याने आरोपीकडुन ४० टन कोळसा किमंती २,००,०००/–रू. व १४ चाकी ट्रक क्रमांक MP-28 H-1472 किंमती २०,००,०००/–रू असा एकुण २२,००,०००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपीं यांची मेडिकल तपासणी करून जप्त मुद्देमालासह पोलीस ठाणे कन्हान यांचे ताब्यात देण्यात आले असून त्यांचे विरूद्ध ३७९, ३४ भा.द.वी. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असुन पुढील तपास पोलीस ठाणे कन्हान करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) तसेच मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले साहेब यांचे मार्गदर्शनात स्थानिक गून्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस उपनिरीक्षक बट्टूलाल पांडे, सहायक फौजदार नाना राऊत, पोलीस हवालार विनोद काळे, गजू चौधरी, ईकबाल शेख, अरविंद भगत, प्रमोद भोयर, संजय बरोदीया, पोलीस नायक विरु नरड, पोलीस अंमलदार राकेश तालेवार चालक मोनू शुक्ला यांनी पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर